bhavishyavani भविष्यवाणी

bhavishya ALLIANCE

भविष्य अलायन्सचे मासिक बातमीपत्रक ऑगस्ट २००९

अंतरंग –

- फूड डायव्हर्सिफिकेशन प्रकल्प – ताज ग्रुप ऑफ हॉटेल्सच्या मॅनेजमेंट ट्रेनीजकडून प्रकल्पाच्या प्रभावाचे परीक्षण.
- गर्ल्स गेनिंग ग्राऊंड - दुसऱ्या टप्प्याच्या प्रेरकांची निवड पूर्ण व मिडीया मॅंटर्सकडून त्यांच्या प्रशिक्षणास सुरुवात
- यशोदा प्रकल्प -२६ – २७ ऑगस्ट २००९ दरम्यान गुलिता, हिंदुस्तान युनिलिव्हर लिमिटेड येथे वर्तणूक बदल कार्यक्रमात ॲक्टिव्हेटर्स कार्यशाळा संपन्न.

## आजपर्यंत

### नंदुरबार जिल्हयात सुरु असलेल्या फूड डायव्हर्सिफिकेशन प्रकल्पाच्या प्रभावाचे परीक्षण ताज ग्रुप ऑफ हॉटेल्सच्या ट्रेनीजमार्फत केले जाणार-

नंदुरबार जिल्हयात प्रकल्पाची अंमलबजावणी सुरु होऊन आता जवळपास एक वर्ष पूर्ण होत आले आहे. १७ ते २७ सप्टेंबर २००९ दरम्यान ताज ग्रुप ऑफ हॉटेल्सच्या मॅनेजमेंट ट्रेनीजमार्फत प्रकल्पाच्या प्रभावाचे परीक्षण केले जात आहे. हा २४ ट्रेनीजचा गट फूड डायव्हर्सिफिकेशन प्रकल्प सुरु झाल्यानंतर, एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचा (आय.सी.डी.एस् चा) पूरक पोषण आहार कार्यक्रम समजून घेईल, बघेल आणि त्याचे परीक्षण करेल. पूरक पोषण आहारात सुधारणा करण्याच्या दृष्टीने गाव / वस्तीचा दृष्टीकोन काय आहे,हयाची माहिती घेऊन प्रकल्पात दुरुस्ती व सुधारणा सुचवेल. अंगणवाडी केंद्रात येणाऱ्या मुलांच्या संख्येत आणि त्यांच्या पोषण परिस्थितीत झालेल्या बदलाबाबतचा सेकंडरी डेटाही ट्रेनीज तपासतील .

आय.सी.डी.एस.च्या सुपरव्हायजर्सच्या मदतीने ते आय.सी.डी.एस.च्या अगदी तळाच्या कार्यकर्त्यांचे रिफ्रेशर ट्रेनिंग घेतील. त्यामुळे स्वयंसहायता गटाची आणि या योजनेतील पुढच्या फळीच्या कार्यकर्त्यींची क्षमता विकसित होऊ शकेल. हया ट्रेनिंगमध्ये, स्वयंपाक करताना राखायची स्वच्छता आणि अन्नातील पोषण दर्जा, हे विषय घेतले जातील.

नंदुरबार जिल्हयाच्या सहा तालुक्यातील प्रकल्प अंमलबजावणीच्या परीक्षणासाठी, हया २४ ट्रेनीजच्या गटाचे ३-४ ट्रेनीजचे छोटे गट बनविले जातील . प्रत्येक तालुक्यातील आय.सी.डी.एस. सुपरवायजर, झोनपातळीवरील स्वयंसहायता गट, अंगणवाडी कार्यकर्ते आणि सहाय्यक यांच्या प्रशिक्षणाच्या समन्वयाचे काम करतील आय.सी.डी.एस. सुपरव्हायजरच्या मदतीने मॅनेजमेंट ट्रेनीज हे प्रशिक्षण पार पाडतील आणि झोन पातळीवरील उपयुक्त मॉडेल बनवतील.

### गर्ल्स गेनिंग ग्राऊंड - दुसऱ्या टप्प्यातील प्रेरकांची निवड पूर्ण आणि त्यांच्या प्रशिक्षणास मिडीया मॅंटर्सकडून सुरुवात :-

भविष्य अलायन्स प्रतिनिधी आणि संबंधित संस्थांमार्फत अंमलबजावणी करणाऱ्या सर्व तालुक्यातील , घेऊ भरारी कार्यक्रमाच्या दुसऱ्या टप्प्यातील प्रेरकांची निवड प्रक्रिया पूर्ण झाली आहे.




गडचिरोली मध्ये प्रेरक निवड प्रक्रिया

### *गडचिरोली जिल्हयात नवीन प्रेरकांचे प्रशिक्षण :-*




गडचिरोली मध्ये प्रेरकांचे अभ्यासक्रमाच्या पहिल्या भागाचे प्रशिक्षण

२५ ऑगस्ट ते ३ सप्टेंबर २००९ या दरम्यान दुसऱ्या टप्प्यातील प्रेरकांचे अभ्यासक्रमाच्या पहिल्या भागाचे प्रशिक्षण, मिडीया मॅटर्सच्या श्रीम. सीमा आणि श्रीम. उज्ज्वला यांनी, नेहरु युवा केंद्राच्या सहकार्याने पार पाडले. एकूण २४ प्रेरकांचे प्रशिक्षण पार पडले असून , त्यांनी गडचिरोली मधील ९ गावांमधील ५०० मुलींना पुढच्या काही महिन्यात प्रशिक्षित करणे, अपेक्षित आहे.

### यशोदा प्रकल्प - २६ – २७ ऑगस्ट २००९ दरम्यान गुलिता, हिंदुस्तान युनिलिव्हर लिमिटेड येथे वर्तणूक बदल कार्यक्रमातील ॲक्टिव्हेटर्सची कार्यशाळा संपन्न:-

'यशोदा' प्रकल्प हा युनिसेफ, हिंदुस्थान युनिलिव्हर लिमिटेड, राजमाता जिजाऊ आरोग्य आणि पोषण कार्यक्रम आणि आय.सी.आय.सी.आय. यांच्या पुढाकारातून साकारलेला प्रकल्प आहे. मुलांच्या रोखलेल्या वाढीला प्रतिबंध करण्यासाठी तसेच स्तनपानासंबंधी वर्तणूक सुधारण्याठी आणि ६ ते ९ महिने वयोगटातील मुलांना पूरक आहार देण्यासंबंधी एक, इतरत्र वापरता येईल अशी संवाद प्रतिकृती (रेप्लिकेबल कम्युनिकेशन मॉडेल) तयार करणे , हा या प्रकल्पाचा उद्देश आहे. प्रकल्पाला युनिसेफकडून तांत्रिक तज्ञ मार्गदर्शन मिळते आहे. ग्रीन केटल कन्सल्टिंगकडून साहित्य निर्मितीसाठी सहकार्य मिळत असून, हिंदुस्थान युनिलिव्हरकडुन प्रकल्प मॅनेज करण्यात पुढाकार घेतला जात आहे.

२६ – २७ ऑगस्ट २००९ दरम्यान वर्तणूक ॲक्टिव्हेटर्सच्या कार्यशाळा पूर्ततेबरोबर, हा प्रकल्प आता तिसऱ्या टप्प्यात पोहोचला आहे. ग्रीन केटल कन्सल्टिंग आणि युनिसेफने, क्वान्टम रिसर्चसह (एक मार्केट रिसर्च एजन्सी) नंदुरबार व नांदेड जिल्हयामध्ये मोठया प्रमाणावर व्यापक भेटी दिल्या. ६ ते ९ महिने वयोगटातील मुलांना पूरक आहार देण्यासंबंधीच्या प्रथांना मदत करणाऱ्या आणि अडथळे आणणाऱ्या गोष्टी, याबाबतची सद्य परिस्थिती आणि सध्याची वर्तणूक , त्यांनी या भेटींमधून समजून घेतली.

२६ – २७ ऑगस्ट २००९ दरम्यान हिंदुस्थान युनिलिव्हर लिमिटेड, युनिसेफ, क्वान्टम मार्केट रिसर्च एजन्सी, ग्रीन केटल कन्सल्टिंग, स्टेट न्युट्रिशन मिशन , माईंडशेअर, लोवे आणि भविष्य अलायन्स या संस्थांच्या एकूण १६ प्रतिनिधींची एक कार्यशाळा आयोजित करण्यात आली

यशोदा प्रकल्प-बिहेवियर चेंज ॲक्टिव्हेटर कार्यशाळा
२६ -२७ ऑगस्ट २००९



बसलेले (डावीकडून ) :- पी.डी.सुदामे,नयन चक्रवर्ती,अमृता गोस्वामी,के.एस.मूर्ती, तरीना रालन
उभे (डावीकडून) :-डॉ.नीरा केवल रामानी,नीता सिंग,डॉ इव्हलेट सिक्वेरा, मनीषा,निशा बोरा,आकांक्षा ठाकोर, हेलन ट्रेव्हस्कीज, रमा अय्यर,अलका गाडगीळ,संगीता दासमोहपात्र, दिपक सुब्रमण्यन,मनीषील गौतम.

होती. या कार्यशाळेत नवीन कल्पना पुढे येण्यासाठी आणि प्रकल्पाकडे सूक्ष्मदृष्टीने बघण्यासाठी , युनिलिव्हरची 'बिहेवियर चेंज इनसाईट ॲक्टिव्हेटर' प्रक्रिया वारण्यात आली. हया गटाचा अनुभव आणि त्यांचे ज्ञान यांचा एकत्रित उपयोग करुन संवादातील सूक्ष्मदृष्टी आणि नवीन कल्पनांची मालिका तयार करणे, हा या कार्यशाळेचा उद्देश होता. त्यातून ग्रामीण भागातील नवजात शिशूंच्या पूरक आहारासंबंधीची वर्तणूक बदल निश्चित करता येईल.

संवादातील सूक्ष्मदृष्टी आणि नवीन कल्पना पुढे येण्यासाठी, सद्य परिस्थितीचे विश्लेषण आणि संशोधनातील निष्कर्ष आधी सर्व सहभागी प्रतिनिधीसमोर मांडले गेले. यु. के. हून झालेल्या श्रीम. हेलन ट्रेव्हस्किज यांनी कार्यशाळा सुलभ सोपी केली. त्या वर्तणूक बदल ॲक्टिव्हेटर मधील तज्ञ समजल्या जातात.

शासन, स्वयंसेवी संस्था आणि खाजगी कंपन्या अशा वेगवेगळया संस्थांमधील विभिन्न पार्श्वभूमी असलेले प्रतिनिधी एका व्यासपीठावर एकत्र आल्यामुळे, ६ ते ९ महिने वयोगटातील मुलांच्या मातांना पूरक आहारासंबंधीच्या योग्य वागणुकीसंबंधीचे महत्त्वाचे संदेश देणारा वर्तणूक बदल कार्यक्रम तयार करण्यासाठी , विविध कल्पना व नवीन दृष्टीकोन मिळू शकले. हया मातांना मिळालेले ज्ञान कृतीत आणण्यासाठी मदतकारक अशी यंत्रणा (मेकॅनिझम) तयार करता आली. खाजगी कंपन्यांच्या सहभागामुळे, वर्तणूक बदलासाठी आवश्यक साधने / महत्त्वाचा दिशादर्शक मार्ग मिळाला तर युनिसेफ व स्टेट न्युट्रिशन मिशनच्या तांत्रिक तज्ञ मार्गदर्शनामुळे व इतरांच्याही आदानप्रदानामुळे नवीन संरचनेमध्ये खूप सूक्ष्मदृष्टी वापरली गेली. ६ ते ९ महिने वयोगटातील मुलांना, स्तनपानाबरोबरच घरातील कुटुंबियांसाठी बनवल्या जाणारा आहार बाळासाठी योग्य असा बदल करुन ३-४ वेळा दिला जावा. बाळाकडे कोणीही लक्ष देत असले तरी यात बदल होणार नाही आणि दिवसभर ते बाळ थोडे थोडे खात रहावे, यासाठी त्याला उत्तेजन दिले जाईल. या सर्व कल्पनांमुळे कार्यक्रमाची संरचना अंतिम करताना , खूप मदत झाली.

----------------------()()()--------------------

तुम्हाला जर कोणत्याही सूचना, प्रतिसाद किंवा सहभाग द्यायचा असेल तर संगीता दासमोहपात्र यांना लिहा:- sangeeta@bhavishyaalliance.org.in / sangeetadm@yahoo.com, भविष्य अलायन्स, प्लॅाट नं.१३१, जे लेन, सागर विहार जवळ, वाशी,नवी मुंबई - ४०० ७०३.फोन: ९१-२२-२७८२३२०२ / २७८२१६५७ फॅक्स : ९१-२२-२७८२४६२९